# ABM got token of appreciation from Dhule Municipal Corporation

ABM got token of appreciation for their complete support to Dhule Municipal Corporation for MAINet and Property Tax services.It was done by Hon. Mayor Mrs. Mahale, Hon. Dy. Mayor Mr. Ansari, Hon. Commissioner Mrs. Sangita Ghaygude & Dy. Commissioner Mr. Kadam on 20.Apr-2017





## दैनिक पुण्य नगरी, दिनांक २१ एप्रिल २०१७

Dhule NEWS

पुण्य नगरी

शुक्रवार, २१ एप्रिल २०१७ | धुळे

# मनपात ऑनलाइन सेवांचे उद्घाटन

### नगरविकास दिनानिमित्त वसुलीत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार

**धुळे : राज्य शासनाच्या निर्देशानुसार महापालिकेत काल पहिला नगरविकास दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध ऑनलाइन सेवांच्या उद्घाटनासह उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार व बेटी बचाव पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.**

राज्य शासनाने २० एप्रिल हा नगरविकास दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने मनपातर्फे दि.२० ते २९ एप्रिलदरम्यान सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त काल सायंकाळी मनपा सभागृहात कार्यक्रम झाला. यावेळी आयुक्त संगीता धायगुडे, उपमहापौर उमर अन्सारी, सहायक आयुक्त त्र्यंबक कांबळे, अभिजीत कदम, पीसीपीएनडीटी सल्लागार समितीचे अध्यक्ष अॅड.चंद्रकांत येशीराव, प्र.सहायक आयुक्त एन.पी.सोनार, उपमुख्य लेखापरीक्षक दीपकांत वाघ, आरोग्याधिकारी डॉ.महेश मोरे, अभियंता कैलास शिंदे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात मनपातील ऑनलाइन सेवांचे उद्घाटन करण्यात आले. यात वारसा हक्क व्यतिरिक्त इतर मिळकतींचे हस्तांतरण, वारसा हक्काने मिळकत हस्तांतरण, थकबाकी नसल्याचा दाखला, मिळकत कर आकारणीचा दाखला आदी सेवांसाठी घरबसल्या अर्ज केल्यानंतर संगणकीकृत दाखले मिळणार आहेत. यावेळी वसुली विभागातील उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**पोस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण**

मनपास्तरीय पीसीपीएनडीटी सल्लागार समितीतर्फे बेटी बचाव या विषयावर जनजागृतीसाठी पोस्टर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेसाठी शहरातील विविध विद्यालय, महाविद्यालयांमधून ६३ पोस्टर्स प्राप्त झाले होते. त्यातून ८ पोस्टर्सची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यात मिझा ताहीद बेग प्रथम, अन्सारी मो.फजल द्वितीय, कल्याणी रमेश बागुल तृतीय आणि उत्तेजनार्थ जयश्री गणेश बाविस्कर, गायत्री पटकर, राजे मच्छींद्र कोळी, डिंपल चंद्रकांत जगताप, नाईक मनीषा जयवंत आदींचा समावेश होता. या कार्यक्रमात स्पर्धेद्वारे प्राप्त बेटी बचावच्या पोस्टर्सचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

**आज आरोग्य तपासणी**

नगरविकास दिनानिमित्त आज (दि.२१) मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर दि.२२ ते २४ दरम्यान, विविध भागातील सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी होईल. दि.२४ रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा हनुमान टेकडी पाणीपुरवठा केंद्रावर अभ्यास दौरा, दि.२५ रोजी केंद्रीय विद्यालयात अग्निशमन बंब व रुग्णवाहिकाद्वारे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक, दि.२६ रोजी सकाळी ७ ते ९ यावेळेत मनपा कार्यालय व दवाखान्यांमध्ये स्वच्छता मोहीम, दुपारी ४.३० वाजता मनपा सभागृहात शहर व्हीजन डॉक्युमेंट तयार करण्याच्या दृष्टीने वास्तुतज्ज्ञ, पर्यावरण प्रेमी, अभियंता व नगरसेवकांचा संयुक्त परिसंवाद, दि.२७ रोजी मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, दि.२९ रोजी दुपारी ४ वाजता मनपाच्या कामकाजाविषयी माहिती प्रदर्शन, भविष्यातील योजनांचा माहितीपट, हगणदारीमुक्तीसाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार तसेच घनकचरा वर्गीकरण प्रदर्शन, प्रात्यक्षिक आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग व वृक्षारोपणासंदर्भात कार्य केलेल्या नागरिकांचा सत्कार आदी कार्यक्रम होणार आहेत.

**आयुक्तांचा सन्मान**

महापालिकेने विक्रमी ९० टक्के कर वसुली केल्याबद्दल आयुक्त संगीता धायगुडे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे नागरी सेवा दिनानिमित्त प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप पांढरपट्टे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## दैनिक दिव्य मराठी, दिनांक २१ एप्रिल २०१७



महापालिकेतील कार्यक्रमाला उपस्थित असलेले अधिकारी व कर्मचारी.

# महापालिकेत ऑनलाइन सेवांचे झाले उद्घाटन

### बेटी बचाव पोस्टर विजेत्यांना देण्यात आले विविध पुरस्कार

प्रतिनिधी | धुळे



पुरस्कार स्वीकारताना विद्यार्थी.

महापालिकेत गुरुवारी वसुली विभागातील कर्मचाऱ्यांचा सत्कार, ऑनलाइन सेवांचे उद्घाटन व बेटी बचाव पोस्टर विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या वेळी ऑनलाइन सेवेचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले.

नगरविकास दिनानिमित्त हे कार्यक्रम झाले. यात दि. ३० एप्रिलदरम्यान विविध कार्यक्रम होतील. मनपाच्या वसुली विभागाने ९२ टक्के वसुली केली. यात चांगले काम करणाऱ्या ८० कर्मचाऱ्यांचा गौरव आयुक्त संगीता धायगुडे यांनी प्रशस्तिपत्रे देऊन केला. आरोग्य विभागातर्फे बेटी बचाव या विषयावर पोस्टर स्पर्धा झाली होती. त्यातील प्रथम क्रमांक मिळविलेल्या एल.एम. सरदार उर्दू हायस्कूलमधील तौहीद बेग मिर्झा, द्वितीय क्रमांक याच शाळेतील मो. फैजल अन्सारी व तृतीय क्रमांक झेड. बी. पाटील महाविद्यालयाची विद्यार्थिनी कल्याणी रमेश बागुल व उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आली. ऑनलाइन सेवेचे प्रात्यक्षिक व माहिती सहायक आयुक्त अभिजित कदम यांनी दिली. यात वारसा हक्काव्यतिरिक्त इतर मिळकतींचे हस्तांतरण, वारसा हक्काने मिळकत हस्तांतरण, थकबाकी नसल्याचा दाखला, मिळकत कर आकारणीचा दाखला आदी दाखले नागरिकांना घरबसल्या संगणकावर अर्ज करून ते मिळवू शकतात. महापालिकेच्या संकेतस्थळावर याबाबतची माहिती देण्यात आली.

या वेळी आयुक्त संगीता धायगुडे, उपमहापौर उमेर अन्सारी, सहायक आयुक्त त्र्यंबक कांबळे, अभिजित कदम, आरोग्याधिकारी डॉ. महेश मोरे, चंद्रकांत येशीराव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाहीद अली यांनी केले. एकाचवेळी तीन कार्यक्रम महापालिकेत झाल्याचे दिसून आले.

## दैनिक लोकमत, दिनांक २१ एप्रिल २०१७



पोस्टर प्रदर्शनातील विजेत्यांसह आयुक्त संगीता धायगुडे व पदाधिकारी.

# उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मनपात सत्कार

**धुळे :** शासनाने या वर्षापासून २० एप्रिल हा दिवस नगरविकास दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने २० ते ३० एप्रिल या कालावधीत विविध कार्यक्रम होणार आहे. गुरुवारी उत्कृष्ट काम करणाऱ्या ८० मनपा कर्मचारी व बेटी बचाओ पोस्टर प्रदर्शनातील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी आयुक्त संगीता धायगुडे, उपमहापौर उमेर अन्सारी, सहायक आयुक्त त्र्यंबक कांबळे, अभिजित कदम उपस्थित होते.